महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ४११ ००४

## प्रकटन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र.परीक्षा ०६२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक २४ जून २०२१ व क्र.प्रवेश ०५२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक १२ जुलै २०२१ रोजीच्या शासन पत्रामधील आदेशानुसार सन २०२१-२२ इ.११ वी प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) राज्यमंडळामार्फत आयोजित करण्यात येणार होती. सदर सामायिक प्रवेश परीक्षेसाठी राज्य मंडळाव्यतिरिक्त अन्य मंडळाच्या प्रविष्ट होणा-या विद्यार्थ्यांकरिता रु. १७८/- परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले होते. राज्यमंडळाच्या संकेतस्थळावर २७५२ विद्यार्थ्यांनी आणि शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांच्या इ.११ वी ऑनलाईन प्रवेशासाठी निश्चित केलेल्या संकेतस्थळावर ४१५८२ विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्राप्त झाली.

तथापि सदर सामायिक प्रवेश परीक्षा शासन निर्णय क्रमांक परीक्षा ०६२१/प्र.क्र.५२/एसडी-२, दिनांक ११/०८/२०२१ अन्वये रद्द करण्यात आल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२ एप्रिल २०२१ मधील तरतुदीनुसार नोंदणी शुल्काची रक्कम वजा करुन, विद्यार्थ्यांनी ज्या payment gateway द्वारे व ज्या माध्यमातून परीक्षा शुल्क जमा केले आहे त्याच मार्गाने प्रति विद्यार्थी रु. १४३/- प्रमाणे परीक्षा शुल्काचा परतावा विद्यार्थ्यांना करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

तरी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने शिक्षक, विद्यार्थी व पालक तसेच इतर सर्व संबंधित घटकांनी याची नोंद घ्यावी.

सचिव,
राज्यमंडळ, पुणे -४

---

क्र.नाविमं/लेखा/२५६५
नाशिक—४२२ ००३.
दिनांक:—०६/०१/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा — नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार.

सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०२०—२१ इ. ११ वी प्रवेशासाठी सामायिक परीक्षा ( सीईटी) उपरोक्त प्रकटना प्रमाणे रदद झाल्याने संबंधित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क रू १४३/— प्रती विद्यार्थी परताव्याचा निर्णय झालेला आहे. सदर बाब शिक्षक/विद्यार्थी/पालक यांचे निदर्शनास आणून दयावी, याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव, करीता
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक